**भारतीय राज्यघटनेची मार्गदर्शक तत्त्वे शासनाला अशी सामाजिक व्यवस्था स्थापण्याचे निर्देश देतात, ज्यामध्ये:**

- ✓ *सर्वांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळेल [कलम ३८(१)];*
- ✓ *सर्वांना पुरेशी उपजीविका मिळवण्याचे अधिकार असतील [कलम ३९ (क)];*
- ✓ *शासन उत्पन्नातील विषमता नष्ट करेल आणि संपत्तीचे केंद्रीकरण होऊ न देण्याचा प्रयत्न करेल [कलम ३८ (२), ३९ (ग)];*
- ✓ *लोकांचे जीवनमान उंचावणे, लोकांच्या आरोग्याचा स्तर सुधारणे, शिक्षण देणे हे शासन आपले प्राथमिक कर्तव्य मानेल [कलम ४१ व ४७].*

लोकायत

दुर्दैवाने, भारतीय संसदेवर वर्चस्व गाजवणाऱ्या सर्व मुख्य पक्षांनी भारतीय राज्यघटनेच्या या कल्पनांना हरताळ फासण्याचेच काम चालवले आहे. देशातील लोकांच्या हिताशी त्यांचे काही देणेघेणे राहिलेले नाही. **१९९१मध्ये अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण चालू केल्यानंतर ते फक्त देशी-विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या नफेखोरीसाठीच देश चालवत आहेत**.

- बलाढ्या कॉर्पोरेट घराणी गरिबांवर हिंस्र हल्ले चढवत आहेत. लाखो लोकांना त्यांच्या जल–जंगल–जमीन–संसाधनांपासून बेदखल केले जात आहे. विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) प्रकल्प, पायाभूत सुविधांचे मोठमोठे प्रकल्प, गोल्फ कोर्सेस व आलिशान गृह प्रकल्प यांसाठी त्यांच्या जमिनी बळकावल्या जात आहेत.
- देशातील शेतीला जाणीवपूर्वक उद्ध्वस्त करण्यात येत आहे जेणेकरून मोठमोठ्या कृषी-बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांचा ताबा घेऊ शकतील. शेतीच्या या उद्ध्वस्तीकरणामुळेच गेल्या २५ वर्षांत साडेतीन लाखांहून जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.
- कंपन्यांना नफा कमावता यावा म्हणून अत्यावश्यक सेवा खाजगी केल्या जात आहेत:
  - सरकारी शाळा आणि दवाखाने एकतर बंद किंवा खाजगी केले जात आहेत;
  - औषधांच्या किंमती वेगाने वाढत आहेत; शाळा–कॉलेजांच्या फी आकाशाला भिडल्या आहेत;
  - वीज महाग झाली आहे; बसभाडे वाढले आहे; रेशनची व्यवस्था संपवली जात आहे;
  - सार्वजनिक उद्योग, सरकारी विमा कंपन्या, बँकांनाही या डाकूंच्या हवाले केले जात आहे.
- आज तरुणांसाठी चांगल्या नोकऱ्याच उपलब्ध राहिल्या नाहीत, देशातील जवळपास अर्धी लोकसंख्या बेरोजगार किंवा अर्ध-बेरोजगार असेल; लाखो लघुउद्योग बंद झाले आहेत.
- देश एका भयंकर पर्यावरणीय विध्वंसाकडे जात आहे. कंपन्यांना बेलगामपणे जंगले तोडण्याची, सागरी शेतीच्या नावाने समुद्रकिनारे नष्ट करण्याची, भूजलाचा अमाप उपसा करण्याची, आपल्या नद्या–जमीन–भूजल–हवा प्रदूषित करण्याची खुली सूट दिली आहे.

**परिणाम:**

- एका बाजूला श्रीमंत अजून श्रीमंत होत आहेत. भारतातील ११९ अब्जपतींची संपत्ती देशाच्या GDPच्या १६% आहे. देशाच्या एकूण संपत्तीचा ६०% पेक्षा अधिक हिस्सा फक्त १% अतिश्रीमंतांकडे एकवटला आहे;
- तर दुसरीकडे, गरीब अजून गरीब होत आहेत:
  - ७५% जनतेला दोन वेळचे पोटभर खायलाही मिळत नाही;
  - ५ वर्षांपेक्षा कमी वयाची ४०% मुलं कुपोषित आहेत;
  - ४२% मुलं आठवीच्या आतच शाळा सोडतात;
  - दरवर्षी लाखो मुलं इलाज होऊ शकणाऱ्या रोगांमुळे मरतात . . .

जसजशी अर्थव्यवस्था खराब होत चालली आहे, तसतसे सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेचेही पतन चालू आहे. सगळीकडे व्याप्त भ्रष्टाचार, जातीवर आधारित समाज ज्यामध्ये एकाबाजूला दलितांवर रोज अत्याचार होतात, धर्माच्या नावावर लोकांमध्ये फूट पाडून एकमेकांबद्दल घृणा करायला शिकवणारे राजकारण केले जाते, एक सडलेली मूल्यव्यवस्था जी क्षुद्र स्वार्थ, असंवेदनशीलता आणि उदासीनतेला प्रोत्साहन देते—हेच आजचे वास्तव आहे.

परंतु सामान्य लोक भारतीय राज्यघटनेच्या या विश्वासघाताला मूकपणे बघत बसलेले नाहीत. वसंत ऋतुत जशी सगळीकडे फुलं उमलू लागतात, तसे देशभरामध्ये ठिकठिकाणी लोक एकत्र येत आहेत. आज त्यांचे संघर्ष लहान आणि विखुरलेले असले, तरी देशाचे भविष्य याच संघर्षांमध्ये आहे. जसजसे अधिक लोक या संघर्षांमध्ये सामील होतील, हे लढे शक्तिशाली बनतील, एकत्र येतील आणि समाज परिवर्तनाची प्रबळ ताकद बनत जातील.

आपण निराशा आणि तटस्थपणा सोडला पाहिजे. सुंदर भविष्याचे स्वप्न पाहिले पाहिजे, विश्वास ठेवला पाहिजे की दुनिया बदलता येऊ शकते. *हो, पर्यायी जग शक्य आहे!* ज्याप्रमाणे हिमालयातील विविध झरे एकत्र येऊन गंगा बनते, त्याचप्रकारे आपले हे संघर्ष भविष्यात एकत्र येतील आणि एक देशव्यापी, शक्तिशाली चळवळ उभी राहील जी साम्राज्यवादी जागतिकीकरणाला आव्हान देईल, आणि राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वप्नानुसार एक नवा समाज स्थापेल. यासाठीच आम्ही **लोकायत**ची स्थापना केली आहे.

**आम्ही विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करत असतो:**

- श्रीमंत–गरिबांमधील वाढती दरी, महागाई, बेरोजगारी; सार्वजनिक वाहतूक, शिक्षण, आरोग्य, रेशन अशा सर्व अत्यावश्यक सेवांचे खच्चीकरण व खाजगीकरण; जातीय शोषण, धार्मिक द्वेष, महिलांवरील हिंसाचार; जनुकीय परिवर्तित पिकांचे दुष्परिणाम, अणुऊर्जेची घातकता, अमेरिकेचा साम्राज्यवाद, जागतिक तापमान वाढ; शेतकऱ्यांच्या समस्या, विकासाच्या नावाखाली कोट्यवधी लोकांच्या जीविका उद्ध्वस्त करणारी धोरणे—अशा विविध प्रश्नांवर जनजागृती अभियाने राबवतो व लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न करतो.
- चर्चासत्रे, व्याख्याने, चित्रपट व माहितीपट महोत्सव, धरणे, मोर्चे यांचेही आयोजन करतो.
- **अभिव्यक्ती** ही लोकायतची महिला आघाडी आहे जी महिलांच्या प्रश्नांवर सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करते.
- **काफ़िला** ही लोकायतची सांस्कृतिक आघाडी आहे जी संगीत, कविता, पथनाट्ये, पोस्टर प्रदर्शन, नृत्य, अभिनय अशा विविध कला-प्रकारांचा वापर करून लोकांच्या सांस्कृतिक जाणिवा वाढवण्याचा प्रयत्न करते.
- जटील भाषेतील कायदा सोपा करून सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी **समतेसाठी वकील** हे विचारपीठ लोकायतच्या पुढाकाराने विधी शाखेच्या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन स्थापन करण्यात आले आहे.
- वरील सर्व विषयांची सोप्या भाषेत उकल करणारी अनेक पुस्तके व पत्रकेही आम्ही प्रकाशित करतो.

**मित्रहो, जर तुम्हाला आमच्याबद्दल अधिक जाणून घ्यायचे असेल किंवा आमच्या उपक्रमांमध्ये सहभागी व्हायचे असेल, तर खालील पत्त्यांवर आमच्याशी संपर्क साधू शकता.**

**संपर्क पत्ता:** लोकायत, १२९ बी/२, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉपजवळ, एरंडवणे, पुणे – ४

*(या पत्त्यावर दर रविवारी संध्या. ५ ते ७:३० या वेळेत लोकायतची बैठक होते. बैठकीत आपलं स्वागत आहे.)*

अलका – 9067003838 ऋषिकेश – 9423507864 www.lokayat.org.in lokayat.india@gmail.com

lokayat.india lokayat.india @lokayat lokayatpune abhivyakti.pune KafilaOfficial

हे पत्रक अलका जोशी यांनी लोकायतसाठी शुक्रवार, दि. २३ ऑगस्ट २०१९ रोजी पुणे येथे प्रकाशित केले.